आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१६ ऑक्टोबर २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सरकारी आणि खासगी शाळातले शिक्षक आणि कर्मचारी तसंच बँका, ट्रस्टमधल्या कर्मचाऱ्यांना जनगणनेचं काम लावलं जाणार

- दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारच्या सेवेतल्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं १ दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीत जमा होणार

- दुष्काळग्रस्त भागातल्या शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या अटी शिथिल

आणि

- महिला क्रिकेटमध्ये भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातल्या टी-ट्वेंटी मालिकेतला पहिला सामना रायपूरमध्ये सुरू

**<><><><><>**

गृह मंत्रालयानं जनगणना कायदा १९४८ अंतर्गत जनगणना दुरुस्ती नियम, २०२६ लागू केले आहेत. याबाबत मंत्रालयानं आज राजपत्राद्वारे अधिसूचना जारी केली. या सुधारणेद्वारे जनगणना करण्यासाठी पात्र व्यक्तींची यादी वाढवली आहे. त्यानुसार, सरकारी, स्थानिक प्राधिकरण, अनुदानित आणि विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांमधले शिक्षक, तसंच संस्था किंवा ट्रस्टद्वारे चालवल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांमधल्या शिक्षकांची नियुक्ती जनगणना कर्मचारी म्हणून केली जाऊ शकते.

या सुधारणेत केंद्र आणि राज्य सरकारं, स्थानिक प्राधिकरणं, तसंच विविध आस्थापनांमध्ये कार्यरत असलेले लिपिक आणि इतर अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम, वैधानिक संस्था, बँका, कंपन्या, विविध संस्था, सोसायट्या आणि ट्रस्ट यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

गेल्या काही वर्षांत देशाच्या राज्यघटनेवर आणि लोकशाहीवर हल्ले करायचा प्रयत्न अनेकदा झाला, मात्र आपली राज्यघटना इतकी भक्कम आहे, की कोणीही भारताच्या

लोकशाहीचं नुकसान करू शकलेलं नाही, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. मुंबई महापालिकेच्या शाळेत भारतीय संविधान या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केलं. तसंच 'स्मार्ट नागरिक - नागरिकशास्त्र आणि संविधानिक मूल्यं' या शालेय अभ्यासक्रम पुस्तकाचं आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित 'विद्यार्थी प्रेरणा- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकांचं प्रकाशन त्यांच्या हस्ते झालं. राज्यघटना जोपर्यंत अस्तित्वात आहे, तोपर्यंत निर्णय घेण्याचा अधिकार संसदेकडेच असेल, असं त्यांनी सांगितलं. बांगलादेश, श्रीलंका किंवा नेपाळ सारखी परिस्थिती भारतात आणण्याचे मनसुबे उधळून लावण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

अंतर्गत आणि बाह्य धोके कितीही आले, तरी डॉक्टर आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेनेच गेल्या ७ दशकांमध्ये भारताला जोडून ठेवलं आहे, असं प्रतिपादन माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी यावेळी केलं.

<><><><>

राज्यात यंदा निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यातले सर्व अधिकारी आणि कर्मचारी, पोलीस तसंच अन्य कर्मचाऱ्यांनी आपलं एक दिवसाचं वेतन मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्यात येणार आहे. राज्य शासनानं यासंदर्भातला आदेश आज जारी केला. ऑक्टोबर महिन्याच्या वेतनातून ही कपात होणार आहे. राज्य शासनाचे सर्व मंत्रालयीन विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालयं, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, महामंडळं तसंच, स्वायत्त संस्थेचे कर्मचारी यांचा यात समावेश आहे.

<><><><>

राज्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या ३०४ तालुक्यांमधल्या पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनानं ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने’च्या अटी शिथिल केल्या आहेत. चारा टंचाईवर मात करण्यासाठी या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थी तसंच शेतकरी गटांना अतिरिक्त चारा बियाणं, आणि ठोंबे वाटप करायला मान्यता दिली आहे. ही सवलत केवळ या वर्षासाठी लागू राहणार आहे. वैयक्तिक लाभार्थ्याकडे स्वतःची किमान तीन ते चार गुरं असण्याची अटही या वर्षासाठी शिथिल केली आहे.

या योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना एक हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर चार हजार रुपये किमतीचं चारा बियाणं दिलं जातं. यंदा संबंधित लाभार्थ्याकडे चारा उत्पादनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असेल आणि प्रथमच लाभ मागणाऱ्या नवीन अर्जदारांची मागणी प्रलंबित नसेल, तर एकापेक्षा अधिक वेळा लाभ द्यायला मान्यता दिली आहे. शेतकरी समूह किंवा गटांना पाच हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत १०० टक्के अनुदानावर २० हजार रुपये किमतीचं चारा बियाणं दिलं जातं. त्यांनाही याचप्रमाणे उपलब्धतेनुसार एकापेक्षा अधिक वेळा बियाणं वाटप करता येणार आहे.

योजनेबाबत अधिक माहितीसाठी पशुपालकांनी १९६२ या कॉल सेंटर क्रमांकावर, किंवा ९०६३१ ४२२९९ या व्हॉट्सॲप चॅटबॉट क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन पशुसंवर्धन विभागानं केलं आहे.

**<><><><><>**

मुस्लिम वैयक्तिक कायद्यांतर्गत सर्व प्रकारच्या तलाक प्रक्रियांसाठी समान सुरक्षात्मक उपाययोजनांची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि इतर संबंधित पक्षांकडून उत्तर मागितलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं ही याचिका तलाक-ए-हसन च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या प्रलंबित याचिकेसोबत जोडली आहे. तलाक-ए-हसनमध्ये तीन महिन्यांच्या कालावधीत दरमहा एकदा तलाक शब्द उच्चारला जातो. या काळात पती-पत्नी पुन्हा एकत्र राहू लागले नाहीत, तर तिसऱ्यांदा तलाक उच्चारल्यानंतर घटस्फोट पूर्ण होतो. या नवीन याचिकेत तलाक-ए-हसन आणि इतर प्रकारच्या एकतर्फी, न्यायालयबाह्य घटस्फोटांवर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

विद्यमान पत्नीला माहिती देऊन तिच्या खुल्या संमतीशिवाय केल्या जाणाऱ्या बहुपत्नीत्वाच्या विरोधातही सुरक्षात्मक उपाययोजनांची मागणी या याचिकेत, केली आहे. याचिकेत घटस्फोटित महिला आणि त्यांच्या मुलांच्या संरक्षणासाठी उपाययोजनांची मागणीही केली आहे.

**<><><><><>**

राज्य शासनाच्या पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागामार्फत आयोजित ‘राज्यस्तरीय उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६’ मध्ये सांगली जिल्ह्यातल्या

मोरया गणेश मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला. नांदेड जिल्ह्यात छत्रपती सार्वजनिक गणेश मंडळाने द्वितीय, तर परभणी जिल्ह्यात स्वराज्य गणेश मंडळाने तृतीय क्रमांक मिळविला. आंतरराष्ट्रीय स्तरावर हाँगकाँगच्या महाराष्ट्र मंडळाने, तर राष्ट्रीय स्तरावर देहरादूनच्या महाराष्ट्र समाज सेवा समितीने प्रथम क्रमांक मिळविला. यंदा प्रथमच जाहीर करण्यात आलेल्या 'वेलिंग-खातू गणेशमूर्तीकार' पुरस्काराचे पहिले मानकरी राजन विष्णू पाटकर ठरले.

या स्पर्धेतील विजेत्या मंडळांचा पारितोषिक वितरण समारंभ आज मुंबईत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झाला.

<><><><><>

सण-उत्सवांच्या काळात साखरेचा पुरवठा पुरेसा व्हावा यासाठी, ऑक्टोबर महिन्यात उत्पादित झालेली साखर, नियमित मासिक कोट्याव्यतिरिक्त, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यात विकण्याची परवानगी केंद्र सरकारनं साखर कारखान्यांना दिली आहे. केंद्रीय अन्न मंत्रालयानं आज सर्व साखर कारखान्यांना तसे निर्देश दिले आहेत. ही विक्री संबंधित महिन्यांसाठी निश्चित केलेल्या नियमित मासिक विक्री कोट्याव्यतिरिक्त असेल, असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

ऑल इंडिया शुगर ट्रेड असोसिएशन चे अध्यक्ष प्रफुल विठलानी यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

<><><><><>

देशातल्या माध्यम आणि मनोरंजन उद्योगाने स्थानिक बाजारपेठांच्या पलीकडे जाऊन विचार करावा आणि जागतिक स्तरावर यश मिळवून देतील, असा आशय आणि बौद्धिक संपदा निर्माण करावी, असं आवाहन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सहसचिव सेंथिल राजन यांनी केलं आहे. मुंबईत १३व्या CII BIG Picture Summitला ते संबोधित करत होते. भारतीय कंटेंट क्रिएटर्स, निर्माते आणि वितरकांनी आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांसाठी साजेशी निर्मिती करावी आणि जागतिक मूल्यसाखळीतलं स्थान मजबूत करावं, असंही ते म्हणाले.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव बालिका अत्याचारप्रकरणी आरोपी शेखर ऊर्फ विजय संजय खैरनार याला आज मालेगावच्या जलदगती न्यायालयाचे न्यायाधीश कृ. ग. पालदेवार यांनी फाशीची शिक्षा ठोठावली. मालेगाव तालुक्यातल्या एका गावात आरोपी खैरनारनं

गेल्यावर्षी १६ नोव्हेंबरला सव्वा चार वर्षांच्या बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केली होती. जलदगती न्यायालयात या खटल्याची सुनावणी होऊन, अवघ्या ११ महिन्यांत न्यायालयानं हा निकाल दिला आहे. याशिवाय पीडितेच्या कुटुंबीयांना राज्य शासनाच्या मनोधैर्य योजनेअंतर्गत १० लाख रूपयांची भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

राज्याला सध्या नदीजोड प्रकल्पांची गरज असून असे प्रकल्प राबवले तर भविष्यात दुष्काळी परिस्थिती उद्भवणार नाही, असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. जनावरांसाठी चारा, आणि शेतकऱ्यांना राज्य सरकारनं जाहीर केलेली मदत, या दोन्हींच्या रकमा वाढवण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर तालुक्यात आडगाव सरक इथं दुष्काळी शेतीची पाहणी केली. पावसाअभावी नुकसान झालेल्या कापूस, बाजरी, मका या पिकांची पाहणी करून त्यांनी शेतकऱ्यांकडून पिकांच्या सद्यस्थितीची माहिती घेतली.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातल्या टी-ट्वेंटी मालिकेतला पहिला सामना आज रायपूर इथं सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यात झालेल्या दोन अपघातात चौघांचा मृत्यू झाला आहे. माहूर मध्ये दर्शनासाठी आलेल्या भाविकांचा टेम्पो किरोळी घाटात आज पहाटे उलटल्याने तीन भाविक ठार झाले तर तिघेजण जखमी झाले आहेत. सर्व भाविक यवतमाळ जिल्ह्यातले होते. दुसऱ्या घटनेत कंधार तालुक्यात बहाद्दरपुरा येथे एक कार मन्याड नदीत कोसळली. कारमध्ये असलेल्या जोडप्यापैकी पती बचावला असून पत्नीचा मृत्यू झाला आहे.

<><><><><>

देशातला पहिला बहुप्रजातीय मत्स्यबीज उत्पादन प्रकल्प वेंगुर्ला तालुक्यात उभादांडा इथं उभारण्यात येणार आहे. सुमारे २२ कोटी २४ लाख रुपये खर्चाच्या या प्रकल्पाचं भूमिपूजन आज मत्स्यव्यवसाय मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

सक्तवसुली संचालनालयाने आर एम ड्रिप अँड स्प्रिंकलर सिस्टिम आणि आर अँड बी डेनिम्स लिमिटेड या सूचिबद्ध कंपन्यांच्या मुंबई आणि गुजरातमधल्या २९ कार्यालयांवर आज छापे टाकून अनेक संशयास्पद कागदपत्र जप्त केली. या कंपन्यांच्या समभागांच्या किमतींमध्ये कृत्रिमरीत्या चढउतार घडवून छोट्या गुंतवणूकदारांचं नुकसान केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

//<><><><><>**//**